| MHNG180001072023 | निशाणी क्र. 2 वरील आदेश<br>**(दिनांक १६ जानेवारी,२०२५)** |
|---|---|

१. सदरील अर्जदाराने महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमचे कलम २३ अनुसार हा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदार क्र. १ चे लग्न गैरअर्जदार क्र. १ सोबत दिनांक ११.०५.२०१४ रोजी रितीरिवाजाप्रमाणे मोहपा येथे झाले. लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ कडे नांदावयास गेली. परंतु गैरअर्जदार क्र. १ ला दारुचे व्यसन असून त्याने फक्त एक महिना अर्जदार क्र. १ हिला चांगले नांदविले. गैरअर्जदार क्र. १ ने दारु पिवून त्याच्या मोठया भावासोबत भांडण केल्यामुळे सर्व भावांनी वेगवेगळे राहण्याचे ठरविले. त्यामुळे अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ हे भाडयाची खोली घेवून वेगळे राहू लागले. परंतु तेथे गैरअर्जदार क्र.२ येवून गैरअर्जदार क्र. १ ला भडकविल्यामुळे तो दारु पिवून अर्जदार क्र. १ सोबत वादविवाद व मारहाण करुन शारीरिक व मानसिक त्रास देत होता.

३. पुढे अर्जदाराने असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ ही दिवाळी असल्याने लक्ष्मी पूजनाच्या दिवशी गैरअर्जदार क्र. २ कडे पुजा करण्यासाठी गेली असता तिने अर्जदारासोबत भांडण केले व गैरअर्जदार क्र. १ ने तिला मारहाण केली. दिनांक १५.०८.२०१७ रोजी ग्रामपंचायत पारडसिंगा येथे झालेल्या आमसभेत गैरअर्जदार क्र. १ हा दारु पिवून आला, सचिवांना शिवीगाळ केली व तेथील कागदपत्र फाडून फेकून दिली. त्यामुळे ग्रामपंचायत पारडसिंगा येथील अधिका–यांनी पोलीस स्टेशन काटोल येथे तक्रार दाखल केली. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ ला अटक होवून जमानत करण्यात आली. दिनांक ०३.०५.२०२० रोजी गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ ला घराबाहेर हाकलून दिले. त्यामुळे नाईलाजास्तव ती माहेरी राहण्यास आली. गैरअर्जदार क्र. १ ने नातेवाईकांसोबत मिटिंग घेतल्यामुळे अर्जदार क्र. १ गैरअर्जदार क्र. १ कडे दि. १३.०५.२०२० रोजी नांदावयास आली तसेच दि १४.०५.२०२० रोजी

नागपूर कोर्टात तारीख असल्यामुळे दोघेही एकत्र तारखेवर गेले. तेथे जज मॅडमने समजुत काढल्यामुळे ते एकत्र राहू लागले. परंतु गैरअर्जदार क्र. १ हा नेहमी अर्जदार क्र. १ ला केस मागे घे नाहीतर तुला जिवंत मारुन टाकेन अशी धमकी देत होता. दिनांक ०२.०२.२०२१ रोजी गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ ला पुन्हा माहेरी आणून सोडल्याचे कथन केले आहे. तेव्हापासून अर्जदार क्र. १ तिच्या माहेरी राहत आहे. अशा प्रकारे गैरअर्जदार हे अर्जदाराचा शारिरीक, मानसिक व आर्थिक छळ करीत आहेत.

४. अर्जदार क्र. १ ने पुढे असे कथन केले आहे की, गैरअर्जदारांकडे शेती असून गैरअर्जदार क्र. १ हा प्रॉपर्टी डिलिंगचा व्यवसाय करतो व दरमहा रु.४०,०००/– ते रु. ४५,०००/– कमावितो. अर्जदार ही आपल्या आईवडिलांकडे राहत असून तिला उपजिवीकेचे कोणतेही साधन नसून ती स्वतःचे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे. करिता अर्जदार क्र. १ ने रु. १५,०००/– खावटी व इतर आदेश मिळण्यासाठी सदर अर्ज केलेला आहे.

५. प्रकरणात गैरअर्जदार हजर झाले. गैरअर्जदारांनी नि.क्र. १० वर त्यांचे लेखी म्हणणे मांडले. गैरअर्जदार क्र. १ ने त्याचा व अर्जदार क्र. १ चा विवाह व त्यांचे नातेसंबंध मान्य करुन इतर सर्व आरोप फटाळले आहेत. गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही पाचसहा महिने चांगली राहिली. परंतु ती गैरअर्जदार क्र. १ वर वेगळे राहण्यासाठी दबाव टाकत होती तसेच क्षुल्लक कारणांवरुन गैरअर्जदार व त्याच्या नातेवाईकांना शिवीगाळ करुन भांडण करत होती. लग्नानंतर सातआठ महिन्याने अर्जदार क्र. १ चे आईवडिलांनी गैरअर्जदारांसोबत भांडण केले व अर्जदार क्र. १ ला मोहपा येथे घेवून गेले. गैरअर्जदार क्र. १ अर्जदार क्र. १ सोबत सासरी राहत असताना त्याचे सासुसासरे व साळा त्याला शिवीगाळ करुन भांडण करीत असत. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ अर्जदार क्र. १ ला घेवून सन २०१६ मध्ये त्याच्या घरी राहण्यास गेला. अर्जदार क्र. १ त्याच्याकडे रहावी, माहेरी जावू नये म्हणून गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ चे अॅडमिशन काटोल येथे नर्सिंग तसेच एच.डी.एफ.सी. च्या कोर्ससाठी केले, तिला निवडणुकीमध्ये उमेदवार म्हणून उभे केले.

दिनांक ०२.०२.२०२१ रोजी अर्जदार क्र. १ ची आई व भाउ गैरअर्जदाराकडील अर्जदाराचे सर्व आंधन, सामान, कपडे व सोन्याचे दागिने घेवून गेले. अर्जदार क्र. १ ही संजिवनी हॉस्पिटल, कळेश्वर येथे काम करुन दरमहा रु. १२,०००/– कमावित असल्याचे कथन केले आहे.

६. गैरअर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, तो आजही अर्जदार तसेच मुलीला ठेवायला तयार आहे. गैरअर्जदारची शेती पडीत असून त्यापासून कुठलेही उत्पन्न होत नाही तसेच तो गवंडी काम करुन रु. ४,०००/– महिना कमावितो.

७. मी अर्जदार व गैरअर्जदार यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

८. मी खालील प्रमाणे मुद्दे काढले असून त्यावरील माझे निष्कर्ष व कारणमिमांसा खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिने मागणी केल्याप्रमाणे ती अंतरिम पोटगी/ खावटीसाठी पात्र आहेत काय? | अर्जदार हे गैरअर्जदार क्र. १ कडून दरमहा अर्जदार क्र. १ ला रु. ३,०००/– व अर्जदार क्र. २ ला रु. २,०००/– अंतरिम पोटगी/ खावटी मिळणेसाठी पात्र. |
| २. | अर्जदार ही तिला लग्नात मिळालेले स्त्रीधन परत मिळण्यास पात्र आहे काय ? | .... **नाही.** |
| ३. | अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ व २ यांच्याकडुन तिला झालेला मानसिक, शारीरिक व भावनीक त्रासाबद्दल रु. ४,००,०००/– नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे काय ? | .... **नाही.** |
| ४. | अर्जदार ही गैरअर्जदारांनी तिच्या | |

| | | |
|---|---|---|
| | कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार करु नये म्हणुन प्रतिबंधात्मक आदेश मिळविण्यास पात्र आहे का ? | ..... **होय** |
| ५. | अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ च्या नावे असलेली जमीन भुमापन क्र. ५०२ हे.आर. मौजा पारडसिंगा ता.काटोल, जि. नागपूर विकण्यापासूनचा मनाई हुकूम आदेश मिळविण्यास पात्र आहे का ? | **.... नाही.** |
| ६. | काय आदेश? | **...अंतिम आदेशा प्रमाणे.** |

## : <u>का र ण मि मां सा</u> :

**<u>मुद्दे क्र.१ ते ५ बाबत</u>** :-

**९.** अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ ची पत्नी आहे ही बाब वादातील नाही. अर्जदाराने विस्तृतपणे तिला झालेल्या कौटुंबिक छळाच्या घटनांचा उल्लेख अर्जामध्ये केलेला आहे. अर्जदाराच्या अर्जावरुन प्रथम दर्शनी अर्जदाराला नाईलाजाने तिच्या माहेरी राहत असल्याचे दिसुन येत आहे. कारण कोणतीही स्त्री विनाकारण माहेरी राहणार नाही. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदाराच्या चरितार्थची कोणतीही व्यवस्था केल्याचे दिसून येत नाही. अर्जदार ही स्वतःचे उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे, असे कथन केले आहे. त्यामुळे या टप्प्यात अर्जदारांकडे उत्पन्नाचे साधन नाही असेच गृहीत धरावे लागेल. असे असतांना गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदाराला उदरनिर्वाहासाठी कुठलीही रक्कम दिलेली नाही. अशा परिस्थितीत गैरअर्जदार याची अर्जदारांच्या पालन पोषन करण्याची सर्वस्वी कायदेशिर व नैतीक जबाबदारी आहे जी गैरअर्जदार क्र. १ याने पार पाडलेली नाही. त्यामुळे अर्जदाराला अडीअडचणींना तोंड दयावे लागत आहे.

**१०.** अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदार क्र. १ हा प्रॉपर्टी डिलिंगचा व्यवसाय करतो व त्यापासून त्याला महिन्याला रु.४०,०००/- ते रु. ४५,०००/- मिळतात असे म्हणणे अर्जदार क्र. १ ने मांडले आहे. परंतु, अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदार क्र. १

च्या व्यवसायाबाबतीत कोणतेही दस्त दाखल केलेले नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ याला महिन्याला रु रु.४०,०००/– ते रु. ४५,०००/– मिळतात याबाबतचा पुरावा पटलावर उपलब्ध नाही. परंतु, हे एक कारण पोटगी नामंजूर करण्यासाठी पुरेसे नाही. आज रोजी अर्जदार क्र. १ व २ तिच्या वडिलांच्या घरी राहतात. ही बाब सुध्दा अंतरिम पोटगीच्या आदेशामध्ये अडसर करणारी असु शकत नाही. तसेच गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार ही संजीवनी हॉस्पिटल, कळमेश्वर येथे नोकरी करुन रु. २०,०००/– ते रु. २५,०००/– महिना कमवित असल्याचे कथन केले आहे. परंतु त्याबद्दल कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. गैरअर्जदार क्र. १ हा धडधाकट असून न्यायालयात हजर सुध्दा झालेला आहे. त्यामुळे तो काम करण्यास समक्ष आहे असा प्रथमदर्शनी निष्कर्ष नक्कीच काढता येईल. आजचे काळात एक मनुष्य किमान मजूरी करून दररोज रु. ४००/– ते रु. ५००/– रूपये कमावु शकतो. शिवाय गैरअर्जदार क्र. १ चांगला तरूण पुरुष आहे. ही बाब लक्षात घेता गैरअर्जदार क्र.१ चांगला कमावता व्यक्ती आहे असे नक्कीच म्हणता येईल. असे असतांना गैरअर्जदार क्र. १ अर्जदारांचा उदरनिर्वाह करण्यास नकार देत आहे. त्यामुळे प्रथम दर्शनी असे नक्कीच म्हणता येईल की, गैरअर्जदार क्र. १ याची सदरची कृती महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमचे अंतर्गत घरगुती हिंसाचारात मोडते. करिता प्रथम दर्शनी नक्कीच असे म्हणता येईल की, अर्जदार गैरअर्जदार क्र. १ कडून अंतरिम पोटगी मिळणेसाठी पात्र आहे.

**११.** या ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे की, अंतरिम पोटगी निश्चित करताना गैरअर्जदाराचे उत्पन्न, अर्जदाराच्या जगण्याचे राहनीमान व कौटुंबिक दर्जाही लक्षात घेणे गरजेचे आहे. अर्जदार सद्य स्थितीला कळमेश्वर येथे राहत असल्याचे दिसुन येते. मोहपा सारख्या ठिकाणचे जीवनमान बघता अर्जदार क्र. १ हिला दरमहा रु. ३,०००/–(रुपये तीन हजार) व अर्जदार क्र. २ ला दरमहा रु.२,०००/– (रुपये दोन हजार) पुरेसे वाटतात.

**१२.** अर्जात नमूद तथ्यांच्या आधारावर अर्जदारांच्या पक्षामध्ये संरक्षण

आदेश देणे सुध्दा आवश्यक वाटते.

**१३.** अर्जदार आज रोजी भाडयाने राहत असल्याचे दिसुन येत नाही. त्याबाबत तिने विस्तृतपणे सांगितलेले नाही. त्यामुळे संपरिक्षेनंतर घरभाडे मंजुर करणे योग्य ठरेल. तसेच स्त्रीधन, गैरअर्जदार यांच्या कडुन नुकसान भरपाई तसेच शेतजमीन विकण्यापासूनचा मनाई हुकुम आदेश या बाबी देखील संपरीक्षेनंतर निर्णीत करणे योग्य ठरेल. अर्जदाराने अर्जात नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे ही बाब लक्षात घेता ती सरंक्षण मिळण्यास पात्र दिसुन येत आहे.

**<u>मुद्दा क्र.६ बाबत</u>** :–

**१४.** अर्जदाराचे पालन पोषणाची नैतिक व कायदेशिर जबाबदारी ही गैरअर्जदार क्र. १ याची आहे. परंतु ती त्याने पार पाडलेली नाही, असे दिसून येत आहे. म्हणून मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## : आ दे श :

**१.** अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

**२.** महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमाचे कलम २३ अंतर्गत असा आदेश देण्यात येतो की, गैरअर्जदार क्र. १ याने सदरचा अर्ज दाखल तारखेपासून (दि. १३.०१.२०२३ पासून) अर्जदार क्र. १ हिला दरमहा रु. ३,०००/–(रुपये तीन हजार) व अर्जदार क्र. २ ला दरमहा रु.२,०००/–(रुपये दोन हजार)याप्रमाणे या प्रकरणाचा अंतिम निकाल लागे पावेतो अंतरिम पोटगी द्यावी.

**३.** गैरअर्जदार यांनी अर्जदारांसोबत कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार करु नये असा प्रतिबंधात्मक आदेश पारीत करण्यात येतो.

४. या आदेशाची प्रमाणीत प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना विनामूल्य पुरविण्यात यावी.

RAVINDRA RATHOD Digitally signed by RAVINDRA RATHOD Date: 2025.01.17 16:14:39 +0530

(आर. एल. राठोड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कळमेश्वर, नागपूर.

कळमेश्वर
दिनांक : १६.०१.२०२५

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per the original Order.

Name of the Stenographer :- R.M. Parmal (Gr. III)